महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
मार्ग विकास विभाग क्र.४ (सा. बां. विभाग)
प्रशासकीय इमारत, ३रा मजला, अंधेरी (प), मुंबई-४०० ०५८
PhoneNo.(022) 26231311 E-Mail :- eerdd4mcc@gmail.com Fax No.(022) 26231587


जा. क्र. माविवि-४/रेशा/ना-हरकत/२६३५/ दिनांकः १३/६/१६

प्रति,

Dy.General Manager,
Mumbai Metro Rail corporation Limited,
MMRDA Building,
Bandra Kurla Complex,
Mumbai - 400 051.

MMRC DATE: 16/5/16 No. 3314

**विषयः** पश्चिम द्रुतगती महामार्गाजवळील सांताक्रुझ येथील स्लिप लेन व सेवा रस्त्याच्या मधील पदपथावरील मुंबई मेट्रो लाईन -३ च्या प्रस्तावित सांताक्रुझ स्टेशनवरुन प्रवेश करण्याच्या व बाहेर पडण्याच्या मार्गास ना हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत, चिफ जनरल मॅनेजर, मुंबई मेट्रो रेल कॉरपोरेशन लि. यांची विनंती.

**संदर्भः**
(१) Dy.General Manager, Mumbai Metro Rail corporation Limited, Letter No. MMRC /ML3-Civ-V/ Santacruz/ PWD/ 485, Date 31/07/2015.
(२) शासन सा.बां. विभाग यांचे पत्र क्र.संकिर्ण-२०१६/प्र.क्र.३५/रस्ते-७, दि.२३/०५/२०१६ रोजीचे पत्र.
(३) प्रादेशिक कार्यालयाचे पत्र क्र.मुअ(विप्र)/का-१/१०२०/२०१६ दि.२४/०५/२०१६.
(४) मंडळ कार्यालयाचे पत्र क्र.मुंबांमं/प्रशा (पुल)/१७५०, दि.०९/०६/२०१६.

GM (Package 6)

पश्चिम द्रुतगती महामार्गाजवळील सांताक्रुझ येथील स्लिप लेन व सेवा रस्त्याच्या मधील पदपथावरील मुंबई मेट्रो लाईन -३ च्या प्रस्तावित सांताक्रुझ स्टेशनवरुन प्रवेश करण्याच्या व बाहेर पडण्याच्या मार्गास ना हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत, चिफ जनरल मॅनेजर, मुंबई मेट्रो रेल कॉरपोरेशन लि. यांनी त्यांचे संदर्भिय पत्र क्र. (१) अन्वये विनंती केली होती त्यास शासनाचे संदर्भीय पत्र क्र. (२) अन्वये त्यात नमुद केलेल्या अटी व शर्तीवर तसेच मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प) यांचे पत्र क्र. मुअ(विप्र)/का-१/मेट्रो रेल/२०३१/२०१५, दि.०५/१०/२०१५ अन्वये प्रस्ताव

सादर करताना त्यात नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहुन परवानगी देण्यास सार्वजनिक बांधकाम विभागाची हरकत नसल्याचे कळविले आहे. सदर पत्रांची छायाप्रत या पत्रा सोबत सादर करण्यात येत आहे.

हे आपल्या माहितीसाठी सादर.

सोबत - वरील प्रमाणे

(सु.सु.देशमुख)
कार्यकारी अभियंता,
मार्ग विकास विभाग क्र.४,
अंधेरी, मुंबई.

प्रत मुख्य अभियंता, (विशेष प्रकल्प) बांधकाम भवन, ५ वा मजला, मुंबई यांना माहितीकरीता सविनय सादर.

प्रत अधीक्षक अभियंता,मुंबई बांधकाम मंडळ,२ रा माळा, प्रशासकीय इमारत आर.सी.मार्ग,चेंबूर, मुंबई-४०० ०७१ यांना माहितीकरीता सविनय सादर.

प्रत सहाय्यक अभियंता श्रेणी-१, मार्ग विकास उपविभाग क्र.१०, सा. बां. चौकी, जुने आनंदनगर, वाकोला, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई ४०० ०५५ यांना माहिती करीता.

०७

# महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३५/रस्ते-७

सार्वजनिक बांधकाम विभाग
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक-२३.०५.२०१६

प्रति,

1 JUN 2016

मुख्य अभियंता, ( विशेष प्रकल्प )
सार्वजनिक बांधकाम विभाग,
मुंबई.

**विषय-** पश्चिम द्रुतगती महामार्गाजवळील सांताक्रुझ येथील स्लिप लेन व सेवा रस्त्याच्या मधील पदपथावरील मुंबई मेट्रो लाईन-३ च्या प्रस्तावित सांताक्रुझ स्टेशनवरून प्रवेश करण्याच्या व बाहेर पडण्याच्या मार्गास नाहरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत, चिफ जनरल मॅनेजर,मुंबई मेट्रो रेल कॉरपोरेशन लि यांची विनंती

**संदर्भ:-** आपले पत्र क्र. मुअ (विप्र )/ का-१/मेट्रो रेल/२०३१/२०१५ ,दि.०५-१०.२०१५.

आपल्या वरील संदर्भांकीत पत्रास अनुसरून असे कळविण्यात येते की, पश्चिम द्रुतगती महामार्गाजवळील सांताक्रुझ येथील स्लिप लेन व सेवा रस्त्याच्या मधील पदपथावरील मुंबई मेट्रो लाईन-३ च्या प्रस्तावित सांताक्रुझ स्टेशनवरून प्रवेश करण्याच्या व बाहेर पडण्याच्या मार्गास नाहरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत, मुख्य अभियंता, ( विशेष प्रकल्प ) सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई. यांनी प्रस्तावात नमूद केलेल्या तसेच खालील अटींच्या अधीन राहून परवानगी देण्यास सार्वजनिक बांधकाम विभागाची हरकत नाही.

1. प्रस्तावित कफ परेड ते सीप्झ भुयारी मेट्रो रेल्वे भाग -३ साठी बोअरींग मशीनने खोदाई करताना काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास अथवा सदर खोदाई मुळे महामार्गाचा रस्त्याचा भाग खचल्यास त्यास मुंबई मेट्रो रेल कॉरपोरेशन लि.कंपनी जबाबदार राहील व त्यासाठी लागणारा रस्ता पुर्नस्थापनेच्या खर्चाचा भरणा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे करणे अनिवार्य असेल.
2. पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या संपुर्ण ROW सा.बां.विभागाकडे असला तरी वाकोला उड्डाणपूल महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारित असल्याने पुलाखालील बांधकामांबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची परवानगी प्राप्त करून घेण्यात यावी.
3. प्रस्तावित सांताक्रुझ मेट्रो स्टेशनकडे जाणाऱ्या प्रवेश व बाहेर पडण्याच्या मार्गाचे ठिकाण( Entry/Exit ) हे कार्यकारी अभियंता यांनी दि.०९.०७.२०१५ रोजीच्या संयुक्त पाहणी दौऱ्या दरम्यान सुचित केल्याप्रमाणे व मुंबई मेट्रो रेल

कॉर्पोरेशन,मुंबई यांनी त्यांच्या दि.३१.०७.२०१५ रोजीच्या इंग्रजी पत्र क्र.MRIRC/ML३/Civ/PCK-V/Santacruz/PWD/४८५ अन्वये सोबत जोडलेल्या नकाशा प्रमाणे बंधनकारक आहे.

4. दिनांक.०९.०७.२०१५ रोजी कार्यकारी अभियंता,मार्ग विकास विभाग क्र.४,अंधेरी व मेट्रो रेल कॉर्पोरेशन,मुंबई चे प्रतिनिधी सोबत झालेल्या संयुक्त पाहणी दरम्यान निदर्शनास आलेल्या गटाराच्या मुद्यांचे अनुषंगाने सदर बांधकाम करतेवेळी बधित होणारे सर्व पावसाळी पाण्याचा निचरा करणाऱ्या गटाराची पुर्न:बांधणी करून देण्याची जबाबदारी मेट्रो रेल कॉर्पोरेशन,मुंबई यांची राहील.
5. प्रस्तावित काम हे टप्या टप्याने करण्यात यावे,जेणे करून महामार्गावरील नियमित वाहतुकीस कोणताही अडथळा होणार नाही व काम चालु करण्यापुर्वी या विभागास त्याची पुर्व सुचना देणे आवश्यक राहील.
6. प्रस्तावित काम पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या हद्दीत येत असल्याने व सदर भाग हा अत्यंत वर्दळीचा असल्याने सदर काम काळजीपुर्वक करणे आवश्यक आहे.सदर काम करताना कोणताही अपघात झाल्यास त्यांस हे कार्यालय जबाबदा असणार नाही.
7. सदर काम करताना निर्माण झालेले डेब्रीज महामार्गावर टाकु नये ते त्वरीत उचलण्याची व्यवस्था करण्यात यावी.
8. सदर कामासाठी वाहतुक पोलीस विभाग,बृहन्मुंबई महानगर पालीका व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याकडुन आवश्यक त्या परवानग्या प्राप्त करून घेणेत याव्यात.
9. सदर काम चालु असताना अपघात होऊ नये म्हणुन मजबुत बॅरिकेड्स,दिशादर्शक फलक,अंबर लाईट इत्यादिची चोख व्यवस्था करण्याची जबाबदारी मुंबई रेल कॉरपोरेशन लि. यांची राहील.
10. सदर काम पुर्ण झाल्यावर सा.बां.वि च्या मानकाप्रमाणे रस्त्याचा पृष्ठभाग करून देणे आवश्यक राहील यासाठी येणारा खर्च मुंबई मेट्रो रेल कॉरपोरेशन लि,यांची राहील.
11. काम चालु करण्यापुर्वी कार्यकारी अभियंता,मार्ग विकास विभाग क्र.-४,अंधेरी व सहायक अभियंता श्रेणी-१. मार्ग विकास उप विभाग क्रं. १०, सांताक्रुझ, मुंबई यांना कळविण्यात यावे व त्यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात यावे.
12. कामाच्या ठिकाणी अस्तीत्वात असलेल्या सेवा वाहिन्यांना क्षती पोहचल्यास तसेच याबाबत नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी सर्वश्री मुंबई मेट्रो रेल कॉरपोरेशन लि, यांची राहील.
13. उपरोक्त अटीचा भंग झाल्यास सदर ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल.
14. सदर जागेची मालकी ही सार्वजनिक बांधकाम विभागाची राहील.

(सु.न.पोरे )
कार्यासन अधिकारी महाराष्ट्र शासन.

प्रत-
अधीक्षक अभियंता,मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर.
निवड नस्ती.

C:\suman\METRO\CR-35-Metro (Westren) -.docx